परळी **संघर्षनेता**
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
https://www.parlisangharshneta.in 9881265102
संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 147 | बुधवार दि. 17 जुन 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

या पॅनलवर आपली जाहिरात हवी आहे
त्वरित संपर्क करा

# अपना सपना मनी मनी! महाराष्ट्रातील खासदारांना विकत घेण्यासाठी

**प्रत्येकी 15 कोटींचा एडवांस देण्यात येत असल्याची माहिती धक्कादायक आणि घृणास्पद आहे!- राऊत**



राज्याच्या राजकारणात खळबळ उडवणारी बातमी आहे, ठाकरे गटाचे राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी ट्विट करत मोठं विधान केलं आहे. अपना सपना मनी... मनी! महाराष्ट्रातील खासदारांना विकत घेण्यासाठी... आज रात्री प्रत्येकी 15 कोटींचा एडवांस देण्यात येत असल्याची माहिती धक्कादायक आणि घृणास्पद आहे! असं राऊत यांनी म्हटलं आहे. या ट्विटमध्ये राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टॅग केले आहे. त्यामुळे आज रात्री मोठ्या घडामोडी घडणार असल्याचे समोर आले आहे.

राज्यात गेल्या काही काळापासून ऑपरेशन टायगरची चर्चा सुरु आहे. आता उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे काही खासदार दिल्लीला गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही दिल्लीला रवाना झाल्याची माहिती समोर आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार परभणीचे खासदार संजय जाधव, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर आणि यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील हे दिल्लीला गेले आहेत. या खासदारांना 15 कोटी रुपये दिले जाणार असल्याचे विधान राऊत यांनी केले आहे.सूत्रांनी दिलेल्या मागितीनुसार उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या 9 खासदारांपैकी 6 खासदार बंड करण्याच्या तयारीत आहेत. 19 जून रोजी शिवसेना पक्षाचा स्थापनादिन आहे. याच्या आधीत हे सर्व खासदार आपला वेगळा गट स्थापन करणार असल्याचे समोर आले आहे. हे खासदार उद्या लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेऊन त्यांना वेगळा गट स्थापन करण्याबाबत पत्र दिले जाणार असल्याचेही समोर आले आहे. यानंतर हा गट दुसऱ्या एखाद्या पान 3 वर

## हालचालींना वेग... ठाकरेंच्या खासदारांपाठोपाठ
# एकनाथ शिंदेही दिल्लीला रवाना



राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी समोर आली आहे. ऑपरेशन टायगरची चर्चा सुरु असताना ठाकरेंचे काही खासदार दिल्लीला गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही दिल्लीला रवाना झाल्याची माहिती समोर आली आहे. सध्या ठाकरे गटाचे दोन खासदार हे दिल्लीत आहेत, तसेच दोन खासदार नॉट रिचेबल असल्याचेही समोर आले आहे. त्यानंतर आता एकनाथ शिंदे हेही दिल्लीला रवाना झाल्याचे समोर आले आहे, त्यामुळे रात्रीत मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे.समोर आलेल्या माहितीनुसार परभणीचे खासदार संजय जाधव, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर आणि यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, शिर्डीचे खासदार भाऊसाहेब बाकचौरे, खासदार राजाभाऊ वाजे हे सर्वजण सध्या दिल्लीला गेल्याची माहिती समोर पान 3 वर

# आज ठळक

## खुशखबर! लाडकींच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. गेल्या अनेक आठवड्यांपासून लाडक्या बहिणीचे हप्ता खात्यात जमा झाला नव्हता.त्यामुळे लाडक्या बहिणी मे महिन्याच्या हप्त्याची प्रतिक्षा करत होत्या. 15 जून रोजी संध्याकाळी लाडक्या बहीणींच्या खात्यात पैसे जमा व्हायला सुरुवात झाली आहे. येत्या 2 दिवसांत सर्व पात्र लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा केले जाणार आहेत.

लाडकी बहीण योजनेचा शेवटचा हप्ता हा गेल्या महिन्यात आला होता. त्यामध्ये मार्च - एप्रिल महिन्याचा हप्ता एकत्र देण्यात आला होता. तर या महिन्यात सरकारने मे महिन्याचा हप्ता जमा केला आहे. तर यामध्ये राज्यातल्या 1 कोटी 77 लाख महिलांना हप्ता पाठवण्यात येईल. याने सरकारचा महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा उद्देश पूर्ण होईल. जर तुमच्या खात्यात मे महिन्याचा हप्ता आला नसेल तर पान 3 वर

## स्मार्ट मीटर बसवला नाही, तर वीज कापणार का? महावितरणकडून स्पष्टीकरण



राज्यभरात स्मार्ट मीटरच्या विरोधाच रान पेटलं आहे. महावितरणने पुढील 48 तासांत स्मार्ट मीटर बसवणार असल्याचे दावा केला आहे. दुसरीकडे स्मार्ट मीटरला मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे. राज्यातील विविध भागात स्मार्ट मीटरविरोधात आंदोलन केलं जात आहे. स्मार्ट मीटरला विरोध वाढल्यानंतर महावितरणने स्पष्टीकरण दिलं आहे.

मागील दोन दिवसांपासून नागरिकांना महावितरणकडून 48 तासांत स्मार्ट मीटर बसवले जाणार असल्याचे मेसेज पाठवण्यात येत आहेत. परंतु या स्मार्ट मीटरविरोधात सर्वसामान्य नागरिकांमध्ये असंतोष पाहायला मिळत आहे. हाच मुद्दा विरोधी पक्षांनी उचलला आहे.विरोधी पक्षांकडून ठिकठिकाणी स्मार्ट विरोधात आंदोलन केली जात आहेत. बदलापुरात दोन सामाजिक कार्यकर्ते उपोषणाला बसले आहेत. तर अंबरनाथमध्ये मनसे नेत्यांनी गळ्यात स्मार्ट मीटर आणि वाढीव बिलांचे फोटो घालून महावितरण अधिकाऱ्यांना जाब विचारला.महावितरण कार्यालयांच्या बाहेर स्मार्ट मीटर आणि टीव्ही फोडून आंदोलन केले जात आहेत. नागरिकांना विश्वासात न घेता मीटर बदलण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप नागरिक आणि राजकीय नेत्यांकडून केला जात आहे. मीटर बसवण्यासाठी सक्ती केली जात असल्याचा आरोपानंतर महावितरणकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.स्मार्ट मीटरवरुन संभ्रम पसरल्यानंतर जुनं मीटर 48 तासांत न बदलल्यास पान 3 वर

## राजकीय पक्ष काढण्याबाबत अभिजीत दीपकेची नागपूरमध्ये मोठी घोषणा



नागपूर: कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांच्यावर जयपूर येथील आंदोलनात झालेल्या हल्लानंतरही आपण मागे हटणार नाही या भूमिकेवर ठाम राहत दिपके नागपुरात आले आहेत. त्यांना वाढत प्रतिसाद बघता कॉक्रोच जनता पार्टीचे राजकीय पक्षात रुपांतर होणार का? असा प्रश्न अनेकांकडून विचारला जातो. तसेच, केंद्र सरकारच्या विरोधात भूमिका घेणारी कॉक्रोच जनता पार्टी मोदी सरकारचा राजकीय पक्ष म्हणून सामना करणार का? असाही प्रश्न अनेकांना पडतो. यावर आता अभिजीत दीपके यांनीच उत्तर दिले आहे.

राजकीय पक्ष उभारण्याबाबत त्यांनी स्पष्ट केलेली भूमिका अनेकांना आश्चर्याचा धक्का देणारी आहे. नागपूरमधील पत्रकार पान 3 वर

## आ. धनंजय मुंडे यांचे स्पष्ट निर्देश ; श्रावणापूर्वी परळीतील 84 खोल्यांचे भक्तनिवास होणार सुरू !

➲ भक्तनिवासाच्या उर्वरित कामांचा कंत्राटदाराला सोबत घेत सर्व संबंधितानी घेतला आढावा







परळी वैजनाथ | प्रतिनिधी बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या परळी वैजनाथ येथे दर्शनासाठी येणाऱ्या लाखो शिवभक्तांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेले 84 खोल्यांचे सुसज्ज भक्तनिवास आगामी श्रावण महिन्यापूर्वी सुरु करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या निर्देशानंतर संबंधित यंत्रणांनी भक्तनिवासाच्या उर्वरित कामांचा आढावा घेत नियोजन निश्चित केले आहे.

परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत माजी मंत्री धनंजय मुंडे व ना. पंकजा पान 3 वर

## ना. पंकजाताई मुंडे यांची शिस्त ; उमेदवार बस्वराज पाटील यांच्या भेटीला पाठवले परळीचे नगरसेवक मतदार !

भाजप महायुतीचे उमेदवार बस्वराज पाटील यांना निवडून आणण्यासाठी जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांना दिल्या सूचना



बीड दि. 16 -- निवडणुकीत उमेदवाराने मतदारांच्या भेटीला जाणे हे आपण समजू शकतो पण इथे चक्क मतदारांनीच उमेदवारांची भेट घेऊन आम्ही सर्व सोबत असल्याचा शब्द देणे हे तसे दुर्मीळच म्हणावे लागेल, असाच काहीसा प्रकार आणि त्याचबरोबर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या शिस्तीचा एक अनोखा पान 3 वर

### ताईची शिस्त अन् नगरसेवक गेले उमेदवाराच्या भेटीला

ना. पंकजाताई हया स्वतः या निवडणुकीवर बारीक लक्ष देत असून जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून बस्वराज पाटील यांना निवडून आणण्यासाठी मेहनत घेत आहेत. अशातच परळी येथील भाजपच्या सर्व नगरसेवकांना काल त्यांनी उमेदवार बस्वराज पाटील यांची भेट घेण्यास सांगितले, आणि आज सकाळी नगरसेवक निळकंठ चाटे, योगेश मेनकुदळे, अंजली माळी, प्रितेश तोतला, आश्विन मोगरकर, राहूल केंद्रे, केशव नागरगोजे, आश्विन आघाव, ॲड प्रणव मराठे या

## फडणवीस सरकारचा मास्टरस्ट्रोक: 6 मोठ्या निर्णयांचा 'या' जिल्ह्यांना होणार बंपर फायदा?



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत विविध क्षेत्रांशी संबंधित 6 महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. आरोग्य, पाणीपुरवठा, तंत्रज्ञान, रोजगार आणि नगरविकास या क्षेत्रांमध्ये राज्याच्या विकासाला चालना देणारे निर्णय मंजूर करण्यात आले असून त्याचा फायदा लाखो नागरिकांना होणार आहे.

वैद्यकीय उपचारांमध्ये अचूकता यावी यासाठी निदान प्रणालीतील महत्वाचा असा प्रकल्प नागपूर येथे राबविण्यात येणार आहे. त्यासाठी हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प पान 3 वर

## परळी रेल्वे स्टेशनवर आज राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष्यांच्या वतिने निवेदन देण्यात येणार

परळी वैजनाथ, दि. 16 जून (प्रतिनिधी) : परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाच्या विकासासाठी तसेच रेल्वे प्रवाशांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने बुधवारी (दि. 17 जून) सकाळी 7 वाजतराणी लक्ष्मीबाई टावर येथुन परळी रेल्वे स्टेशन येथे आंदोलन करण्यात येणार आहे. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार गट

या आंदोलनाच्या माध्यमातून केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन सादर करण्यात येणार असून, परळी वैजनाथ रेल्वे टर्मिनसच्या विकासासंदर्भातील महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात येणार आहेत. यापूर्वी 8 जून 2026 रोजी परळी येथे झालेल्या एकदिवसीय धरणे आंदोलनातही रेल्वे प्रवाशांनी या मागण्यांसाठी जोरदार आवाज उठविला होता.

खासदार बजरंग सोनवणे यांनी रेल्वे मंत्रालयाकडे मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये गाडी क्रमांक 12749/12750 मच्छलीपट्टणम–बिदर एक्स्प्रेसचा परळी वैजनाथपर्यंत विस्तार, नाशिक कुंभमेळ्यासाठी परळीमार्गे विशेष रेल्वे सेवा सुरु करणे, तसेच परळी वैजनाथ टर्मिनस येथे पीआयटी (PIT) लाईन सुविधा पान 3 वर

## सिरसाळ्यातील एमजीबीच्या मग्रूर बॅंक व्यावस्थापका विरोधात बेमुदत अंदोलन

**शेकडो नागरिक आक्रमक,व्यावस्थापक रेड्डी बद्दल खातेदार नागरिक संताप**



सिरसाळा : सिरसाळ्यातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या मग्रूर शाखा व्यवस्थापका विरोधात बेमुदत तिव्र अंदोलन पत्रकार मिलिंद चोपडे व सहकारी यांनी छेडले आहे. सिरसाळ्यातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा व्यवस्थापक हा खातेदार शेतकरी,पत्रकार,नागरिक यांच्याशी उद्धट बोलत गैर मग्रूरीने वागतो. खातेदारांशी समन्वय ठेवत नाही. तसेच कर्जमाफी बद्दल विचारले असता पत्रकार मिलिंद चोपडे यांना गुन्हे खोटे दाखल करण्याची धमकी व बँकत येण्यास परवानगी लागते असे बेकायदेशीर वक्तव्य पान 3 वर

## धक्कादायक! परळी हादरलं; लग्न ठरलं, बस्ता बांधला अन् 'अग्नीवीर' नवरदेवाचा लग्नाआधीच नवरीवर अत्याचार




बीड जिल्ह्यातील (Beed News) परळी तालुक्यात (Parli) एक धक्कादायक घटना समोर आली आहे. लग्नाची तारीख ठरली, मंगल कार्यालय, आचारी ठरला. बस्ता बांधला, पत्रिकाही छापल्या मात्र ऐनवेळी लग्न मोडलं. होणाऱ्या नवरदेवाने होणाऱ्या नवरीला विश्वासात घेऊन भलतीच मागणी केली आणि होत्याचं नव्हतं झालं. अग्नीवीर असलेल्या तरुणाने लग्नाआधीच तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून जबरदस्तीनं शरीर संबंध ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पीडित तरुणीच्या फिर्यादीवरुन अग्नीवीर (आर्मीमध्ये असलेल्या) भरत चंद्रकांत तोंडे याच्यासह त्याच्या घरातील 7 जणांविरुद्ध परळी येथील ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आल्याचे समजते. (पोटच्या मुलांनी घराबाहेर काढल्याने असहाय्य वृद्धाची थेट 'इच्छामरणाची' मागणी)

मिळालेल्या माहितीनुसार, परळी तालुक्यातील एका 24 वर्षीय पीडित तरुणीचे भरत चंद्रकांत तोंड (रा. सोनीमोहा ता.धारुर) याच्यासोबत लग्न ठरलं. दरम्यानच्या काळात भरत तोंडे याने आपल्या होणाऱ्या पत्नीकडे शरीर सुखाची मागणी केली, परंतु पीडितेने वेळोवेळी नकार दिला. परंतु नवरदेवाने होणाऱ्या नवरीला विश्वासात घेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

धक्कादायक म्हणजे आरोपी भरत तोंडे याने त्याच्या आई, वडिलांशी, बहीण, भावाशी, भाऊजी आणि मामाशी बोलणे करुन पीडितेचा विश्वास संपादन केला. 20 डिसेंबर 2025 रोजी अग्नीवीर असलेला भरत तोंडे पीडितेच्या गावी गेला. तुला माझ्या आई, वडिलांनी अर्जंट भेटायला बोलावलं आहे, असे म्हणून पीडितेला दुचाकीवर बसवून वडवणीच्या पुढे थोड्या अंतरावर असलेल्या एका लॉजवर नेलं. आपण लग्न करणार आहोत असे सांगून भरत तोंडे याने आपल्या होणाऱ्या पत्नीसोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवले. त्यानंतर दोघांच्याही कुटुंबियांनी 6 मे 2026 ही लग्नाची तारीख निश्चित केली. भरत पान 3 वर

# सुपर अल-निनो म्हणजे समस्याही सुपर !

आपल्या देशात 1972 साली सर्वात मोठा दुष्काळ पडला होता. त्याकाळी हवामानाचा वेध घेण्यासाठी उपग्रह यंत्रणा तसेच वातावरणात होणारे बदल याची माहिती जवळपास नव्हती. दुष्काळ आला इतकच ज्ञान सर्वांना होतं . आता बदलत्या तंत्रामुळे एल निनो अन् सूपर अल निनो याची माहिती खूप आधी आपणास झाली आहे. 1972 सालचा दुष्काळ सर्वांना यासाठी स्मरणात आहे की, त्याकाळी मोठ्या प्रमाणावर अन्नटंचाई निर्माण झाली होती.

शेतीचे उत्पादन नगण्य झाल्याने खाण्यासाठी धान्य नाही अशी स्थिती असल्याने अमेरिकेतून आपणास धान्य मागवावे लागले होते. नंतरच्या काळात तांत्रिक आणि यांत्रिक प्रगती झपाट्याने झाली असली तरी समस्या कमी झालेली नाही. उलट समस्येचे स्वरुप खूप बदलले आहे आणि गंभीर झाले आहे. याची आपणास जाणीव असणे गरजेचे आहे.

1971 साली भूजल उपशाचे प्रमाण नगण्य होते आणि लोकसंख्या देखील मर्यादित होती. मात्र गेल्या 5 दशकात शहरीकरण झपाट्याने झाले आणि लोकसंख्या देखील झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे यावेळी पिकांचे संकट अधिक पेयजलाचे संकट असे दुहेरी संकट आपणासमोर आहे.

यांत्रिकीकरणात झालेली वाढ आणि ऊस, कापूस या सारख्या नगदी व नफा देणाऱ्या पिकांकडे शेतकरी वर्ग वळला, यामुळे भूजल ऊपसा प्रचंड प्रमाणात सुरु आहे. धरणे जरी बांधली गेली असली तरी त्या धरणाच्या पाण्याचा वापर उद्योग , कृषी आणि पेयजल असा विभागला आहे. नागरिकांच्या पेयजलाची काळजी घेण्यासाठी ठराविक क्षमतेनंतर कृषीला अर्थात सिंचनाला पाणी दिले जात नाही. सध्या दोन नक्षत्रे कोरडी गेली असल्यानं हे संकट अधिक गहिरं झालं आहे.

शेतकऱ्यांना निसर्ग जणू नाराज आहे आणि दुसऱ्या बाजूला आता सिंचनासाठी पाणी न देण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग अक्षरश: आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.

अल-निनो समजून घेताना त्याच्या तांत्रिक बाबीत सांगता येईल की, प्रशांत महासागरात पाण्याचे तापमान सुमारे 2 अंश सेल्सिअस वाढल्याने संपूर्ण निसर्गचक्र बदलले आहे.

*नेमेची येतो पावसाळा-

असं आपण म्हणतो पण यंदा त्याचा नेम चुकलाय आणि तो कधी आणि किती येईल हे सांगणे अवघड झालय. आलाच पाऊस तर नेमकेपणाने तो कुठे, कधी आणि किती पडेल हा देखील सवाल आहे. अशा पार्श्वभूमीवर शेतकरी वर्गाला सातत्याने हवामान खात्याचा इशारा बघा, माहिती घ्या आणि पेरणी करण्याबाबत घाई करु नका असा झाला आहे.

अल निनोची स्थिती निसर्गत: दर काही काळाने येते मात्र त्याचं गांभीर्य वाढत आहे याचं एकमेव कारण म्हणजे आपण चालवलेला नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर होय.

मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड ही जगासमोरील एक मोठी समस्या आहे. सोबतच जंगलांना लागणारी आग अर्थात वन-वणव्यात नष्ट होणारी जंगले यामुळे पृथ्वीवरील वृक्षाच्छादन झपाट्याने घटताना दिसत आहे.

2015 च्या फ्रान्स करारानुसार कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा निर्णय झाला परंतु यातून अमेरिकेने माघार घेतली. त्यासोबतच जगभरात जिवाश्म इंधन अपरिमितरित्या वापरले जात आहे. यातून होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाचा परिणाम वैश्विक पातळीवर होत आहे.

मोठमोठ्या हिमनद्या तसेच अर्क्टीक व अंटार्टिका मधील बर्फ वेगाने वितळून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत आहे. याचा धोका थेट पूर्ण पर्यावरणास आहे. आपण आपल्या महत्वाकांक्षा आणि पैशाच्या बळावर नैसर्गिक संसाधनं ओरबाडत आहोत, असेच म्हणावे लागेल.

पाऊस कमी, दुष्काळ, पाऊस जास्त, अतिवृष्टी, आणिबाणीची स्थिती हे एक चक्र आहे. शासन यात दिलासा नक्की देत आहे पण निसर्ग हा निसर्ग आहे.

_Nature is biggest leveler _... अशी उक्ती आहे. निसर्ग कोपला तर काय यावर डिस्कव्हरी वाहिनीने Raging Planet नावाची मालिका बनवली आहे ती आपण बघितली पाहिजे.

आपण निसर्गाचाच एक घटक आहोत, आधी बुद्धीमत्ता आणि आता आलेली कृत्रिम बुद्धीमत्ता यांच्या बळावर आपण निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न सुरु ठेवला आहे. परंतु हे सर्व प्रयत्न एका फटक्यात आपणास काय स्थितीत नेवून पोहोचवतील याचाही अंदाज हवा आणि जाणीव हवी. आपण निसर्गाचं खूप काही देणं लागतो.

पुढच्या पिढीलाही वसुंधरा सुखरुप देणं हे आपलं कर्तव्य आहे. आपण एक सुरेख ब्लु प्लॅनेट Blue Planet नव्या पिढीला देणार की एक Raging (खवळलेला) Planet याचाही निर्णय आपणास घ्यायचा आहे.

अल निनोच्या संकटावर मात करताना आगामी काळात प्रत्येकाने आपली भूमिका समजून आपले कर्तव्य मानून योग्य कृती न केल्यास काळ कठीण आहे. वेळीच सावध व्हा...! अद्याप सुरुवातच झालीय पण उशीर झालेला नाही.

**प्रशांत दैठणकर**
**9823199466**

# महाराणा प्रताप : राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक

**- डॉ. राजेंद्र बगाटे**





भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि योद्धे होऊन गेले. काहींनी आपल्या सामर्थ्याच्या बळावर मोठी साम्राज्ये उभी केली, तर काहींनी प्रशासन, संस्कृती आणि लोककल्याणाच्या माध्यमातून आपले वेगळेपण सिद्ध केले. परंतु केवळ पराक्रमामुळे नव्हे, तर स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यप्रेम आणि अदम्य जिद्दीमुळे जनमानसात अजरामर ठरलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे महाराणा प्रताप. भारतीय संस्कृतीत मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या वीरांची परंपरा आहे. या परंपरेतील तेजस्वी नाव म्हणून महाराणा प्रताप यांचा उल्लेख केला जातो. मेवाडच्या या महान राजाने कोणत्याही प्रकारच्या परकीय अधिपत्यापुढे झुकण्यास नकार दिला आणि जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. त्यामुळेच आजही त्यांचे जीवनचरित्र प्रेरणेचा अखंड झरा मानले जाते.

भारतातील अनेक भागांत तिथीनुसार महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदा 17 जून रोजी तिथीनुसार महाराणा प्रताप जयंती साजरी होत आहे. हा दिवस केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणाचा नसून स्वाभिमान, त्याग, राष्ट्रभक्ती आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे पुनर्स्मरण करण्याचा आहे.

महाराणा प्रताप यांचा जन्म राजस्थानमधील कुंभलगड येथे झाला. त्यांचे वडील महाराणा उदयसिंह द्वितीय हे मेवाडचे शासक होते, तर माता जयवंता बाई यांनी प्रताप यांच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कारांची समृद्ध छाप उमटविली. बालपणापासूनच प्रताप यांच्यात निर्भयता, शौर्य आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. तलवारबाजी, घोडेस्वारी, धनुर्विद्या आणि युद्धकौशल्य यांचे शिक्षण त्यांनी अत्यंत निष्ठेने घेतले. राजपुत्र म्हणून त्यांना राजवैभवाचा अनुभव मिळाला; परंतु पुढील आयुष्यात त्यांनी वनवास, दारिद्र्य आणि संघर्ष यांचाही तितक्याच धैर्याने स्वीकार केला.

सोळाव्या शतकातील भारताच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिले असता मुघल साम्राज्याचा विस्तार वेगाने होत होता. सम्राट अकबराने विविध राजपूत संस्थानांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अनेक राजपूत राजांनी मुघल अधिपत्य स्वीकारले; परंतु मेवाडचे स्वातंत्र्य टिकविण्याचा निर्धार महाराणा प्रताप यांनी केला. मेवाड हा केवळ एक प्रदेश नव्हता, तर तो राजपूत स्वाभिमानाचे प्रतीक होता. त्यामुळे मेवाडच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणे प्रताप यांना मान्य नव्हते.

इ.स. 1572 मध्ये महाराणा प्रताप यांचा मेवाडच्या सिंहासनावर राज्याभिषेक झाला. त्या वेळी मेवाड अनेक संकटांनी वेढलेला होता. चित्तौडगड आधीच मुघलांच्या ताब्यात गेला होता. राज्याची आर्थिक स्थिती कमकुवत होती आणि अनेक भागांवर बाह्य दबाव होता. अशा कठीण परिस्थितीत प्रताप यांनी राज्यकारभाराची धुरा सांभाळली. त्यांनी आपल्या प्रजेचा विश्वास संपादन केला आणि मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी अखंड संघर्ष करण्याचा संकल्प केला.

अकबराने अनेक वेळा दूत पाठवून महाराणा प्रताप यांना मुघल अधिपत्य स्वीकारण्याचा प्रस्ताव दिला. परंतु प्रताप यांनी स्वाभिमानाशी तडजोड करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यांच्यासाठी राज्यापेक्षा स्वातंत्र्य अधिक महत्त्वाचे होते. ते म्हणत असत की परकीय अधीनतेत वैभवशाली जीवन जगण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी संघर्ष करताना कष्ट सहन करणे अधिक श्रेष्ठ आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे ते भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील अग्रगण्य प्रेरणास्त्रोत ठरतात.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातील सर्वाधिक प्रसिद्ध घटना म्हणजे हळदीघाटीची लढाई. 1576 मध्ये मेवाड आणि मुघल सैन्य यांच्यात हळदीघाटी येथे भीषण युद्ध झाले. मुघल सैन्याचे नेतृत्व आमेरचे राजा मानसिंह करत होते, तर महाराणा प्रताप स्वतः आपल्या सैन्याचे नेतृत्व करत होते. संख्येने मुघल सैन्य अधिक बलवान असले, तरी मेवाडच्या सैनिकांनी अद्भुत शौर्याचे दर्शन घडविले. या युद्धात महाराणा प्रताप यांचा प्रिय घोडा चेतक याने दाखविलेली निष्ठा आणि पराक्रम आजही लोककथांचा विषय आहे.

चेतक हा केवळ घोडा नव्हता, तर महाराणांचा विश्वासू सहकारी होता. युद्धादरम्यान गंभीर जखमी होऊनही त्याने महाराणांना सुरक्षित स्थळी पोहोचविले. अखेरीस त्याचा मृत्यू झाला. चेतकाच्या निष्ठेची कथा भारतीय जनमानसात आजही भावनिक आदराने सांगितली जाते. महाराणा प्रताप आणि चेतक यांचे नाते हे माणूस आणि प्राणी यांच्यातील स्नेह, विश्वास आणि समर्पणाचे अद्वितीय उदाहरण मानले जाते.

हळदीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे संघर्षमय जीवन अधिक कठीण बनले. त्यांनी अरवली पर्वतरांगांमध्ये आश्रय घेतला. कुटुंबासह त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. दंतकथांनुसार त्यांच्या कुटुंबाला अनेकदा उपासमारीची वेळ आली. जंगलात राहून त्यांनी आपल्या स्वातंत्र्यलढ्याची ज्योत कायम ठेवली. संकटांनी खचून न जाता त्यांनी नव्या जोमाने सैन्य संघटित केले आणि गनिमी काव्याच्या तंत्राचा प्रभावी वापर केला.

महाराणा प्रताप यांच्या संघर्षात भामाशाह यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. भामाशाह हे महाराणांचे विश्वासू सहकारी होते. त्यांनी आपल्या संपत्तीचा मोठा भाग महाराणा प्रताप यांच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी अर्पण केला. या आर्थिक मदतीमुळे महाराणांना सैन्याची पुनर्बांधणी करता आली. राष्ट्रहितासाठी संपत्तीचा त्याग करण्याची प्रेरणा भामाशाह यांच्या उदाहरणातून मिळते.

महाराणा प्रताप हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते दूरदृष्टी असलेले प्रशासकही होते. त्यांनी आपल्या राज्यातील जनतेच्या कल्याणाला प्राधान्य दिले. प्रजेच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या. शेती, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न केला. जंगलांमध्ये आणि डोंगराळ भागातही प्रशासन प्रभावीपणे चालविण्याची त्यांची क्षमता उल्लेखनीय होती.

त्यांच्या राज्यकारभारातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सर्वधर्मसमभाव. महाराणा प्रताप यांनी विविध समाजघटकांना आपल्या संघर्षात सहभागी करून घेतले. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांतील लोक होते. हकीम खान सूर यांच्यासारख्या मुस्लिम योद्ध्यांनीही मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केले. यावरून महाराणा प्रताप यांची राष्ट्रकल्पना ही धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक होती, हे स्पष्ट होते.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातून आत्मसन्मानाचे महत्त्व अधोरेखित होते. आजच्या भौतिकवादी युगात अनेकदा तत्त्वांशी तडजोड करण्याची प्रवृत्ती दिसून येते. अशा वेळी प्रताप यांचे जीवन आपल्याला मूल्यांशी प्रामाणिक राहण्याची प्रेरणा देते. त्यांनी संकटांना घाबरून माघार घेतली नाही. अपयश आले तरी संघर्ष सोडला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही जिद्द आणि चिकाटी आजच्या तरुण पिढीसाठी विशेष मार्गदर्शक ठरते.

इतिहासात अनेकदा युद्धांच्या निकालावरुन व्यक्तिमत्त्वांचे मूल्यमापन केले जाते; परंतु महाराणा प्रताप यांच्या बाबतीत तसे घडत नाही. हळदीघाटीच्या युद्धात निर्णायक विजय मिळाला नसला, तरी त्यांनी स्वातंत्र्याचा लढा अखंड सुरु ठेवला. पुढील काळात त्यांनी मेवाडमधील अनेक प्रदेश पुन्हा आपल्या ताब्यात घेतले. चावंड येथे त्यांनी नवी राजधानी स्थापन केली आणि राज्याची पुनर्बांधणी केली. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन केवळ युद्धाच्या निकालावर नव्हे, तर त्यांच्या अटळ संघर्षावर केले पाहिजे.

महाराणा प्रताप यांच्या चरित्राचा प्रभाव साहित्य, लोककला आणि जनमानसावर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसतो. राजस्थानातील लोकगीतांमध्ये त्यांच्या शौर्याचे वर्णन आढळते. अनेक कवी, लेखक आणि इतिहासकारांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. श्यामनारायण पांडे यांच्या 'हल्दीघाटी' या काव्यातून महाराणांच्या पराक्रमाचे प्रभावी चित्रण केले गेले आहे. विविध भाषांमधील साहित्यकृतींनी त्यांच्या स्मृती जिवंत ठेवल्या आहेत.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही महाराणा प्रताप यांचे उदाहरण प्रेरणादायी मानले गेले. परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेतली. स्वराज्य, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची भावना जागृत करण्यासाठी त्यांच्या जीवनाचा उल्लेख केला जात असे. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत आदर्श व्यक्तिमत्त्वांची गरज असते आणि महाराणा प्रताप हे त्यापैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे.

आजच्या काळात महाराणा प्रताप जयंती साजरी करताना केवळ मिरवणुका, पुष्पहार आणि औपचारिक कार्यक्रम यांपुरते मर्यादित राहणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा समाजजीवनात अंगीकार होणे आवश्यक आहे. स्वाभिमान म्हणजे अहंकार नव्हे, तर स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होय. राष्ट्रभक्ती म्हणजे इतरांविषयी द्वेष नव्हे, तर देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदान देण्याची वृत्ती होय. त्याग म्हणजे केवळ भौतिक वस्तूंचा त्याग नव्हे, तर सामूहिक हितासाठी वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवण्याची तयारी होय. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून या मूल्यांचे शिक्षण मिळते.

तरुण पिढीसमोर आज अनेक आव्हाने आहेत. स्पर्धात्मक जीवनशैली, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, मूल्यांमधील बदल आणि करिअरची धडपड या सर्वांमध्ये आत्मविश्वास आणि नैतिकतेचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत महाराणा प्रताप यांचे जीवन युवकांना प्रेरणा देऊ शकते. प्रतिकूल परिस्थितीतही ध्येयाप्रती निष्ठा राखणे, परिश्रम करण्यास तयार राहणे आणि संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य बाळगणे ही शिकवण त्यांच्या चरित्रातून मिळते.

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनेही महाराणा प्रताप यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी विविध समाजघटकांना एकत्र आणून स्वातंत्र्यलढा उभारला. आज विविधतेने नटलेल्या भारताला सामाजिक सलोखा, परस्पर आदर आणि एकात्मतेची गरज आहे. मतभेद असले तरी राष्ट्रीय हित सर्वोच्च मानण्याची वृत्ती समाजात रुजली पाहिजे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून ही प्रेरणा मिळते.

इतिहासाचा अभ्यास करताना व्यक्तिपूजेला बळी पडणे योग्य नाही; परंतु महान व्यक्तिमत्त्वांकडून प्रेरणा घेणे आवश्यक आहे. इतिहास हा केवळ भूतकाळाचा लेखाजोखा नसून वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्य घडविणारा मार्गदर्शक असतो. महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला शिकवते की परिस्थिती कितीही कठीण असली, तरी धैर्य, आत्मविश्वास आणि मूल्यनिष्ठा यांच्या बळावर संकटांवर मात करता येते.

महाराणा प्रताप यांचे निधन 1597 मध्ये झाले. मृत्यूपूर्वीही त्यांनी मेवाडच्या स्वातंत्र्याची चिंता व्यक्त केली होती, असे सांगितले जाते. आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी मातृभूमीप्रती निष्ठा कायम ठेवली. त्यांच्या पश्चातही त्यांच्या संघर्षाची परंपरा जिवंत राहिली. आज अनेक स्मारके, पुतळे आणि ऐतिहासिक स्थळे त्यांच्या स्मृती जागवितात; परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या विचारांचे स्मरण समाजाच्या चेतनेत कायम राहणे आवश्यक आहे.

महाराणा प्रताप जयंती हा केवळ एका राजाचा जन्मदिन नाही, तर तो भारतीय स्वाभिमानाचा उत्सव आहे. या दिवशी आपण त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलूंचे स्मरण करून स्वतःला अधिक जबाबदार नागरिक बनविण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, धैर्य, स्वातंत्र्यप्रेम आणि राष्ट्रसेवा ही मूल्ये आपल्या आचरणात उतरली, तरच महाराणा प्रताप यांना खरी आदरांजली वाहिली जाईल.

आज भारत प्रगतीच्या नव्या वाटेवर वाटचाल करीत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि अर्थव्यवस्था या क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. तथापि, या प्रगतीला नैतिक मूल्यांची जोड असणे आवश्यक आहे. विकासासोबतच चारित्र्यनिर्मितीही महत्त्वाची आहे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून मिळणारी प्रेरणा या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. त्यांनी दाखवून दिले की भौतिक यशापेक्षा तत्त्वनिष्ठा अधिक मौल्यवान असते.


महाराणा प्रताप यांचे चरित्र हे भारतीय संस्कृतीतील तेजस्वी अध्याय आहे. त्यांचा संघर्ष, त्याग आणि स्वाभिमान यांची गाथा पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देत राहील. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचे स्मरण करून राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचा, सामाजिक ऐक्य जपण्याचा आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा निर्धार करूया. कारण इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचे स्मरण तेव्हाच सार्थ ठरते, जेव्हा त्यांच्या आदर्शांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसून येते.

महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, संसाधने कितीही मर्यादित असली, तरी ध्येय स्पष्ट असेल आणि त्यासाठी अखंड प्रयत्न करण्याची तयारी असेल, तर अशक्य वाटणारी उद्दिष्टेही साध्य करता येतात. स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवणारा हा महान योद्धा भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करीत, तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या महाराणा प्रताप जयंतीनिमित्त सर्वांना प्रेरणा, ऊर्जा आणि राष्ट्रसेवेची नवी दिशा लाभो, हीच कृतज्ञ भावना व्यक्त करावीशी वाटते.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

# आंदोलनातील महिला, सत्तेतील पुरुष? : वास्तव, प्रतिनिधित्व आणि लोकशाहीचा प्रश्न

**डॉ. भारत कऱ्हाड**





"आंदोलनात महिला आणि सत्तेत पुरुष" हे वाक्य सार्वजनिक चर्चांमध्ये अनेकदा ऐकायला मिळते. काही जण ते वास्तवाचे प्रतिबिंब मानतात, तर काही जण त्याला अतिसुलभीकरण म्हणतात. मात्र या विधानाकडे केवळ घोषणावजा वाक्य म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. कारण हा विषय केवळ महिलांच्या आंदोलनातील सहभागाचा नसून प्रतिनिधित्व, नेतृत्व, सत्ता आणि निर्णयप्रक्रियेमधील त्यांच्या स्थानाचा आहे.

भारतातील अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय आंदोलनांमध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय प्रमाणात दिसून येतो. स्वातंत्र्य चळवळीपासून ते आजच्या विविध जनआंदोलनांपर्यंत महिलांनी केवळ उपस्थिती नोंदवलेली नाही, तर अनेक ठिकाणी नेतृत्वाची भूमिकाही पार पाडलेली आहे. पाणी, शिक्षण, आरोग्य, महागाई, शेती, रोजगार आणि सामाजिक न्याय यांसारख्या प्रश्नांवर महिलांचा सहभाग विशेषत्वाने जाणवतो. कारण या प्रश्नांचा थेट परिणाम त्यांच्या दैनंदिन जीवनावर होत असतो.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. त्यानंतर चिपको आंदोलन, विविध शेतकरी आंदोलने, स्वयंरोजगार, बचत गट चळवळी, अंगणवाडी व आशा सेविकांची आंदोलने अशा अनेक चळवळींमध्ये महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. त्यामुळे आंदोलनांमध्ये महिलांचा सहभाग ही अपवादात्मक नव्हे तर सातत्याने दिसणारी बाब आहे.

मात्र आंदोलनांमधील सहभाग आणि सत्तेतील प्रतिनिधित्व या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. लोकशाही व्यवस्थेत सत्ता म्हणजे केवळ निवडणूक जिंकणे नव्हे. निर्णय घेण्याची क्षमता, धोरणनिर्मितीतील सहभाग, संसाधनांवरील नियंत्रण आणि संस्थात्मक प्रभाव यांचाही त्यात समावेश होतो. या दृष्टीने पाहिले तर राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील सत्ताकेंद्रांमध्ये पुरुषांचे प्रमाण अजूनही महिलांपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. संसद, विधानसभा, मंत्रीमंडळे आणि अनेक राजकीय पक्षांच्या नेतृत्व संरचनेत पुरुषांचे वर्चस्व मोठ्या प्रमाणावर आहे.

याचा अर्थ महिलांचा सत्तेतील सहभाग नाही, असा मात्र होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणामुळे लाखो महिला ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका यामध्ये निवडून आल्या आहेत. अनेक ठिकाणी त्यांनी प्रभावी नेतृत्व सिद्ध केले आहे. ग्रामीण भागात महिला सरपंच आणि लोकप्रतिनिधींनी विकासकामांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे सत्तेच्या क्षेत्रात महिलांची उपस्थिती वाढत असल्याचेही वास्तव लक्षात घ्यावे लागते.

महिलांच्या आंदोलनातील सहभागाकडे केवळ संख्येच्या दृष्टीने पाहणे योग्य ठरणार नाही. अनेकदा त्या स्वतःच्या अनुभवांमधून आणि प्रश्नांमधून आंदोलनात सहभागी होतात. पाणीटंचाई, महागाई, आरोग्य सुविधा, शेतीची संकटे किंवा रोजगाराचा प्रश्न यांचा सर्वाधिक परिणाम महिलांवर होत असल्याने त्या या प्रश्नांवर आवाज उठवतात. त्यामुळे आंदोलनांमधील त्यांचा सहभाग हा सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब मानला पाहिजे.

या चर्चेमध्ये आणखी एक मुद्दा वारंवार उपस्थित केला जातो. काही ठिकाणी आंदोलने, मोर्चे किंवा राजकीय कार्यक्रमांसाठी सहभागी व्यक्तींना पैसे, प्रवासभत्ता किंवा इतर सुविधा देण्यात येतात. ही बाब पूर्णपणे नाकारता येणार नाही. राजकीय आणि संघटनात्मक कार्यक्रमांच्या व्यवस्थापनामध्ये अशा प्रकारच्या सुविधा काही ठिकाणी दिल्या जातात. मात्र या वास्तवाच्या आधारे सर्व आंदोलनांचा किंवा सर्व सहभागींच्या भूमिकेचा एकच अर्थ लावणे योग्य ठरणार नाही.

या विषयाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सहभाग आणि नेतृत्व यांतील फरक. एखाद्या आंदोलनात मोठ्या संख्येने महिला सहभागी असल्या तरी निर्णय घेणाऱ्या समित्या, वाटाघाटी करणारे प्रतिनिधी किंवा संघटनात्मक नेतृत्व यामध्ये त्यांचे प्रमाण किती आहे, हा स्वतंत्र प्रश्न आहे. अनेकदा आंदोलनातील सहभाग मोठा असतो; परंतु निर्णयप्रक्रियेमधील प्रतिनिधित्व त्याच प्रमाणात दिसत नाही. त्यामुळे चर्चेचा केंद्रबिंदू महिलांचा सहभाग नसून त्यांच्या नेतृत्व आणि प्रतिनिधित्वाचा असायला हवा.

माध्यमे आणि सार्वजनिक चर्चाही या विषयावर परिणाम करतात. अनेकदा आंदोलनांमधील दृश्य उपस्थितीवर भर दिला जातो; परंतु त्या मागील सामाजिक कारणे, संघटनात्मक रचना किंवा नेतृत्वातील असमतोल यांचा पुरेसा विचार केला जात नाही. त्यामुळे विषयाचा अभ्यास करताना केवळ दृश्य स्वरूपावर न थांबता व्यापक सामाजिक संदर्भ समजून घेणे आवश्यक ठरते.

गेल्या काही दशकांमध्ये महिलांचे शिक्षण, आर्थिक सहभाग आणि राजकीय जागरूकता वाढली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून राष्ट्रीय राजकारणापर्यंत त्यांची उपस्थिती वाढताना दिसत आहे. तरीही निर्णयप्रक्रियेतील त्यांचा वाटा, नेतृत्वाच्या संधी आणि उच्चस्तरीय सत्तेमधील प्रतिनिधित्व यांविषयीचे प्रश्न अद्याप कायम आहेत.

म्हणून "आंदोलनात महिला आणि सत्तेत पुरुष" हे वाक्य संपूर्ण वास्तव सांगत नाही; परंतु ते एका महत्त्वाच्या चर्चेकडे लक्ष वेधते. महिलांचा आंदोलनांमधील सहभाग मोठा आहे, त्यांचे सत्तेतील प्रतिनिधित्व वाढत आहे, परंतु सहभाग आणि सत्ता यांतील समतोल अद्याप पूर्णपणे साधलेला नाही. लोकशाहीमध्ये केवळ उपस्थिती नव्हे, तर निर्णयप्रक्रियेमधील प्रभावही महत्त्वाचा असतो.

अखेरीस, हा विषय महिलांविरुद्ध किंवा पुरुषांविरुद्ध नसून लोकशाहीतील प्रतिनिधित्वाचा आहे. समाजातील ज्या घटकांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग मोठा आहे, त्यांना निर्णयप्रक्रियेतही तितकीच संधी मिळणे ही लोकशाहीची अपेक्षा आहे. त्यामुळे या विषयाकडे आरोप-प्रत्यारोपांच्या चष्म्यातून नव्हे, तर वास्तव, आकडेवारी आणि सामाजिक बदल यांच्या आधारे पाहणे अधिक आवश्यक ठरते.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

पक्षात सामील होऊ शकतो आणि एनडीएला पाठिंबा देण्याची शक्यता आहे.

गेल्या काही महिन्यांपासून ऑपरेशन टायगरची चर्चा सुरु आहे, ठाकरे गटाचे खासदार नाराज खासदार एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याचेही समोर आले होते. मात्र आता घडामोडींना वेग आला आहे, काही खासदारांनी उद्धव ठाकरेंच्या कार्यशैलीवर नाराजी व्यक्त केली होती. आता हे खासदार काय निर्णय घेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

-----------------------------------

आली आहे. यातील काही खासदार नॉट रिचेबल असल्याची माहिती समोर आली आहे. हे खासदार आता नवा गट स्थापन करणार असल्याचे समोर आले आहे. त्यासाठी ते उद्या लोकसभा सदस्यांना पत्र देणार असल्याचे समोर आले आहे.समोर आलेल्या माहितीनुसार उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या 9 खासदारांपैकी 6 खासदार बंड करण्याच्या तयारीत आहेत. येत्या 19 जूनला शिवसेना पक्षाचा स्थापनादिन आहे. या दिवसाच्या अगोदरच हे सर्व खासदार आपला वेगळा गट स्थापन करण्याच्या विचारात आहेत, असे बोलले जात आहे. त्याबाबतची तयारीही सुरु झाली असल्याचे समोर आले आहे. हे खासदार उद्या लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेणार असून त्यांना वेगळा गट स्थापन करण्याबाबत पत्र दिले जाणार असल्याचेही समोर आले आहे. असे झाल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना हा सर्वात मोठा धक्का असणार आहे.दरम्यान, काही खासदार हे उद्धव ठाकरेंच्या कार्यशैलीवर नाराज असल्याची माहिती समोर आली होती. उद्धव ठाकरेंनी बोलावलेल्या बैठकीला काही खासदार प्रत्यक्ष उपस्थित होते, तर काही खासदार ऑनलाईन उपस्थित होते. तेव्हापासून हे खासदार फुटणार असल्याचे समोर आले होते. त्यानंतर आता घडामोडींना वेग आला आहे.

----------------------------------------

परिषदेत ते बोलत होते.परीक्षांमध्ये होणारे घोटाळे, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि जबाबदारीची उणीव यामुळे देशाचे अतोनात नुकसान होत असून शिक्षणमंत्र्यांनी राजनीमा न दिल्यास देशातील वेगवेगळ्या शहरांमध्ये शांततामय मार्गांनी आंदोलन करण्यात येईल, असे दीपके यांनी सांगितले. पुण्यानंतर, लखनऊ, जयपूर, बंगळुरू, नागपूर अशा शहरांमध्येही कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन होईल. तरीही राजीनामा न दिल्यास येत्या 20 जून रोजी दिल्लीत संपूर्ण देशभरातील विद्यार्थी एकत्र येऊन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागितला जाणार आहे. राजीनामा घेतल्याशिवाय माघार घेणार नाही असेही दीपके म्हणाले. विद्यार्थ्यांची जबाबदारी घेण्यासाठी आम्हाला राजकारणात उतरावे लागत असेल तर ही खेदाची गोष्ट आहे. प्रत्येक व्यक्ती राजकीय पक्ष काढू शकत नाही. प्रत्येकाला राजकारणात यावे लागत असेल तर ज्यांना निवडून दिले ते काय करत आहेत. उद्या काहीही समस्या आली तर प्रत्येक व्यक्ती राजकीय पक्ष काढणार आहे का?. राजकीय पक्षांवरील विश्वास ढासळत चालल्यामुळे नव्या लोकांनी समोर यावे अशी मागणी होते. देशात प्रत्येक ठिकाणी हिंदू-मुस्लीम राजकारण केले जाते. यातून कुणालाच फायदा होत नाही. समस्येसाठी प्रत्येकाला राजकारणात उतरावे लागत असेल तर ही शक्य नाही. अशी वेळच देशातील तरुणांवर यायला नको, असेही दीपके म्हणाले.नेपाळ आणि श्रीलंकेच्या आंदोलनाबाबत अभिजीत दीपके यांनी स्पष्ट मत मांडले होते. त्यांनी भारत आणि शेजारील देशांतील परिस्थितीची तुलना नाकारली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, भारतीय तरुणांची तुलना नेपाळ किंवा बांगलादेशमधील आंदोलनांशी करणे हा भारतीय तरुणांचा अपमान आहे. भारतीय तरुण अधिक सुशिक्षित आणि राजकीयदृष्ट्या जागरूक आहेत. ते म्हणाले की, भारतात तरुणांचे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण, लोकशाही मार्गाने आणि संविधानाच्या चौकटीत राहील. भाजपकडून आमच्यावर राष्ट्रद्रोही असा आरोप केला जातो. त्यामुळे या देशात केवळ भाजपचे लोकच राष्ट्रप्रेमी आहेत का, असा प्रश्नही दीपके यांनी सांगितले.

-------------------------------------

मुंडे यांच्या प्रयत्नातून निधी प्राप्त झाला होता. या निधीतून विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. मात्र, विविध कारणांमुळे पोलीस स्टेशनजवळ उभारण्यात आलेले 84 खोल्यांचे भक्तनिवास अपूर्ण अवस्थेत पडून आहे.या पार्श्वभूमीवर ही बाब धनंजय मुंडे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यानंतर त्यांनी तात्काळ दखल घेत संबंधित कंत्राटदाराला उर्वरित कामे युद्धपातळीवर पूर्ण करून भक्तनिवास वैद्यनाथ देवस्थान समितीच्या ताब्यात देण्याच्या सूचना दिल्या. याअनुषंगाने माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, वैद्यनाथ देवस्थान समितीचे विश्वस्त राजेश देशमुख, गटनेते वैजनाथ सोळंके, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे आणि तीर्थक्षेत्र विकास योजनेचे कंत्राटदार जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान यांनी संयुक्तपणे भक्तनिवासाची पाहणी केली. श्रावण महिना सुरु होण्यापूर्वी भक्तनिवास देवस्थान समितीच्या ताब्यात देण्यासाठी आवश्यक नियोजन यावेळी निश्चित करण्यात आले. कंत्राटदार जाफर खान यांनीही उर्वरित सर्व कामे श्रावणापूर्वी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. भक्तनिवास सुरु झाल्यानंतर परळी येथे दर्शनासाठी येणाऱ्या शिवभक्तांना व भाविकांना अत्यंत माफक दरात निवासाची सुविधा उपलब्ध होणार असून तीर्थक्षेत्राच्या विकासाला चालना मिळणार आहे. यामुळे भाविकांची गैरसोय दूर होऊन धार्मिक पर्यटनालाही मोठी मदत होणार आहे.

----------------------------------------

अनुभव आज भाजपच्या पदाधिकाऱ्यांना आला.

झाले असे, सध्या बीड-धाराशिव-लातूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची रणधुमाळी जिल्ह्यात सुरु आहे, येत्या 18 तारखेला मतदान आहे. भाजपा महायुतीचे उमेदवार म्हणून माजी मंत्री बस्वराज पाटील निवडणुक रिंगणात आहेत, सध्या ते जिल्ह्यात ठिकठिकाणी प्रचारासाठी फिरून नेते आणि नगरपरिषद सदस्यांच्या भेटी घेऊन विजयासाठी आवाहन करत आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी ना. पंकजाताई मुंडे यांची परळी निवासस्थानी भेट देखील घेतली होती.

-------------------------------------

(High Energy Medical Cyclotron Project- NHECP) उभारणीस मान्यता. मध्य भारतातील एकमेव महत्वाकांक्षी प्रकल्प असणार आहे. ज्यामुळे गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रणालीमुळे विविध रोगांचे, आजारांचे निदान करण्यासाठी या प्रणालीचा वापर करता येईल. (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग) महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण 2026 जाहीर. राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर प्रभावी व कायमस्वरुपी उपाययोजनांवर भर. ग्रामीण पेयजल योजनांचा शाश्वत विकास होणार. विविध योजनांचे एकत्रिकरण करून धोरण राबविण्यात येणार. स्वच्छ, निर्जंतुक व दर्जेदार पाणी पुरवठा व्हावा यासाठीचे नियोजन. योजना चांगल्या रितीने राबविण्यासाठी दीर्घकालीन नियोजन होणार. (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)महाराष्ट्र स्वयंचलित प्रणाली (Maharashtra Unmanned Systems Policy) धोरण-2026 जाहीर. हवाई, सागरी तसेच जमिनीवरील कृषि व अन्य ठिकाणच्या विविध कामांसाठी या स्वयंचलित प्रणालीतील उपकरणांची निर्मिती करण्यासाठीचे धोरण. जोखमीच्या आणि अवघड परिस्थितीतील कामांसाठी वापरता येणाऱ्या ड्रोनसह, विविध रोबोटसची निर्मिती या क्षेत्रातील संशोधन व विकास, मनुष्यबळ प्रशिक्षण आदी उपक्रमांना प्रोत्साहन मिळणार. (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग)राज्यात भारत नेट कार्यक्रम राबविण्यासाठी सुधारित पद्धतीस मंजुरी. हा (Amended Bharat Net Program) कार्यक्रम राबविण्यासाठी "महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (MDIL)" या नावाने विशेष हेतू वहन यंत्रणा (State-led Special Purpose Vehicle - SPV) स्थापन करणार.

-----------------------------------

मंजूर करुन त्यांचे बांधकाम करणे या मागण्यांचा समावेश आहे.

मच्छलीपट्टणम–बिदर एक्स्प्रेसचा परळीपर्यंत विस्तार झाल्यास हैदराबाद, विकाराबाद, बिदर, उदगीर, लातूर रोड आणि परळी परिसरातील प्रवाशांना मोठा लाभ होणार असून हैदराबाद विमानतळाशी संपर्क अधिक सुलभ होईल. तसेच आगामी नाशिक कुंभमेळ्यासाठी विशेष रेल्वे सेवा सुरु झाल्यास मराठवाडा आणि सीमाभागातील हजारो भाविकांना सोयीस्कर प्रवास करता येणार आहे.

दरम्यान, परळी वैजनाथ टर्मिनस येथे पीआयटी लाईन उभारल्यास रेल्वे गाड्यांची देखभाल, नवीन गाड्यांचे नियोजन आणि भविष्यातील रेल्वे सेवांचा विस्तार करण्यास मोठी मदत होणार असल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

परळीच्या रेल्वे विकासासाठी या मागण्या अत्यंत महत्त्वाच्या असून, नागरिकांनी आंदोलनात सहभागी होऊन रेल्वे प्रवाशांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा द्यावा,राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाच्या वतीने आव्हान करण्यात येते

-----------------------------------

करण्याच्या कारणातून अंदोलन सुरु आहे. दिलेल्या निवेदनात पत्रकार मिलिंद चोपडे व सहकारी यांनी म्हटले आहे कि, महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा सिरसाळा येथे काही कामानिमित्त गेलो होतो. बँकेत शाखा व्यवस्थापक संदिप रेड्डी यांना या दरम्यान कर्जमाफी संदर्भात पत्रकार चोपडे यांनी विचारले कि, आपल्या शाखेत किती कर्जदार शेतकरी आहेत ? किती थकीत आहेत किंवा किती शेतकरी कर्जमाफीस पात्र असे विचारले असता समाधानकारक न उत्तर देता , मग्रूरी ने म्हणाले कि सांगत नाही, मग वरिष्ठांचा संपर्क मागितला तर तोही संपर्क दिला नाही. असे मग्रूरीने का वर्तन करत आहेत असे विचारले असता त्यांनी खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली, पोलीसांना बोलावतो म्हणाले आणि तुम्ही बँकेत कुणाची परवानगी घेऊन आलात ? बँकेत यायला परवानगी लागते असे म्हणत मला बाहेर जा म्हणाले. एवढे उद्धट गैरवर्तन मॅनेजर ने पत्रकार मिलिंद चोपडे यांच्याशी करत खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली . याच बरोबर बँकेत यायला परवानगी लागते, परवानगी शिवाय बँकेत येता येत नाही असे बेकायदेशीर वक्तव्य त्यांनी केले आहे.

म्हणून या बाबीवरुन पत्रकार चोपडे त्यांचे सहकारी अदित्य मेंडके, गणेश काळे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाख सिरसाळा समोर दिनांक 16 जून रोजी सकाळी 10 वाजल्यापासून अंदोलनास बसलो आहेत .मागणी रितसर अशी आहे कि, खातेदार नागरिकांशी गैरवर्तन करणाऱ्या मॅनेजर संदिप रेड्डी यांची येथून तात्काळ बदली करुन सिरसाळा शाखेत सुसंस्कृत मराठी भाषक मॅनेजर नियुक्त करण्यात यावा अशी विनंती आहे. अंदोलन दरम्यान शेकडो नागरिकांनी भेट देऊन मॅनेजर संदिप रेड्डी याच्या वर्तना बद्दल संताप व्यक्त करुन अंदोलनास समर्थन दिले आहे.

मॅनेजर संदिप रेड्डी यांनी अनेक खातेदार नागरिकांशी गैरवर्तन केले आहे. असे संतप्त नागरिक व्यक्त झाले. संतप्त नागरिकांनी सह्यांची प्रत सोबत जोडली आहे. संबंधित मॅनेजरची बदली न झाल्यास अंदोलन अविरत चालू ठेवण्यात येईल असा इशारा अंदोलन कर्त्यांनी दिला आहे. सदरील अंदोलनास सिरसाळ्यातील व परिसरातील अनेक नागरिक भेट देत पाठिंबा दिला आहे.

-------------------------------------

तोंडे यांच्या घराचे बांधकाम सुरु असल्याने त्यांनी पीडितेच्या वडिलांकडे 4 लाख रुपयांची मागणी केली. सदरील रक्कम घेऊन गेले असल्याचे फिर्यादीत सांगण्यात आले आहे.लग्नाची तारीख जवळ आल्याने बस्ता बांधला गेला, पत्रिका छापल्या मात्र 21 एप्रिल 2026 रोजी भरत तोंडे याने पीडितेला फोन करुन मला तुझ्याशी लग्न करायचे नाही, काय करायचे ते कर असे सांगितले. एवढेच नव्हे तर मला फोन करुन त्रास दिल्यास तुला जगू देणार नाही अशी धमकी दिली असल्याचे ही फिर्यादीत सांगण्यात आले आहे. या दिलेल्या धमकीनंतर त्या पीडित मुलीने व तिच्या कुटुंबियांनी भरत तोंडेच्या इतर नातेवाईकांना याची माहिती दिली. मात्र, त्यांनीही पीडितेला धमक्या दिल्या. अखेर पीडितेने परळी ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिल्यानंतर तब्बल 5 दिवसानंतर गुन्हा दाखल करुन घेतला.या प्रकरणात पीडितेच्या तक्रारीवरुन भरत चंदक्रांत तोंडे, कासाबाई चंद्रकांत तोंडे, चंद्रकांत लक्ष्मण तोंडे, शिवकन्या दत्ता मुंडे, दत्ता मुंडे, पवन चंद्रकांत तोंडे, सुशेन बडे, वनिता गोकुळ भांगे, उत्रेश्वर गणपती घोळवे, सचिन जालिंदर फड आणि विकास उत्तम तोंडे या 11 जणांविरुद्ध परळी येथील ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे सांगण्यात आले आहे.पीडितेवर अग्नीवीर जवान भरत तोंडे याने अत्याचार करुन ऐनवेळी लग्न मोडले. या घटनेमुळे पीडितेसह तिच्या कुटुंबियाला मोठा धक्का बसला आहे. एवढेच नव्हे तर विवाहाचे आमिष दाखवून भरत तोंडे याने शारिरीक व लैंगिक शोषणही केले. 5 दिवसांच्या पाठपुराव्यानंतर परळी पोलिसांनी गुन्हा दाखल करुन घेतला. मात्र, महिना उलटला तरीही आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. राजकीय दबावामुळे कारवाईला विलंब होत असून वारंवार पोलिस स्टेशन, वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि पोलिस अधीक्षक कार्यालयाचे उंबरठे झिजविण्याची वेळ पीडितेवर आली आहे. या प्रकरणाची दखल घेऊन मला न्याय द्यावा, अन्यथा इच्छा मरणाची परवानगी द्यावी अशी विनंती पीडितेने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत 5 जून 2026 रोजी मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचे समजते.

-------------------------------------

तुम्ही पुढील पद्धतीने तपासू शकता. ही प्रोसेस अगदी सोपी आहे. सर्वात आधी बँक खातं अपडेट करा. मोबाईल बँकिंग, नेट बँकिंग किंवा ATM चे स्टेटमेंटचे व्यवहार तपासा. कारण जेव्हा हप्ता दिला येतो त्याचा एसएमएस पाठवला जातो.तुमचं बँक खातं आधारशी जोडलेलं आहे का ते तपासा. बँकेत जाऊन किंवा बँकेच्या ग्राहक सेवा केंद्रात चौकशी करा. कारण आधार सीडिंगमध्ये काही चूक असेल तर हप्ता अडकू शकतो. तुम्ही लाडकी बहीण योजनेच्या अधिकृत पोर्टल किंवा ॲपवर लॉगिन करा. अर्ज क्रमांक किंवा लिंक केलेला मोबाईल नंबर वापरून स्टेटस तपासा. अर्ज "Approved", "Pending" किंवा "Rejected" आहे का तेही तपासा. अशा पद्धतीने तुम्ही लाडकीचा हप्ता तपासू शकता.

---------------------------------------------

वीजप्रवाह रोखण्याचा दावा महावितरणने फेटाळून लावला आहे. महावितरणचे अधीक्षक अभियंता धनंजय अहिरे यांनी सांगितलं की, 'स्मार्ट मीटरमध्ये अचूक बिल येईल. घरगुती ग्राहकांना स्मार्ट मीटरमध्ये आताच्या दराच्या तुलनेत 85 पैशांनी सवलत मिळणार आहे. या मीटरचे कोणतेही चार्जेस लागणार नाही. सध्या ग्राहकांना विनंती आहे की, वीज बिल अचूक येण्यासाठी आणि नियंत्रण मिळवण्यासाठी स्मार्ट मीटर बसवून घ्यावेत, असं आवाहन देखील त्यांनी केलं.

## पान 4 वरुन

अधिकाऱ्यांचे विशेष पथक नियुक्त करून ड्रोनद्वारे नदीपात्राची पाहणी केली. 'ईटीएस' मोजणीत केवळ 5 हजार ब्रासची मंजुरी असताना तब्बल 20 हजार ब्रास वाळूचा अवैध उपसा झाल्याचे वास्तव समोर आले होते. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांच्यासह 16 गावांतील मंडळ अधिकारी, तलाठी आणि ग्रामसेवकांसह एकूण 50 जणांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती.या महा-वाळू घोटाळ्यात थेट संशयाच्या भोवऱ्यात सापडलेले गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांना प्रशासनाने सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. आपल्यावरील संभाव्य निलंबन किंवा फौजदारी कारवाई टाळण्यासाठी खोमणे यांनी अनेकदा मुंबई वारी केल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. एका मंत्र्यांच्या भेटीसाठीही त्यांनी मोठी धावपळ केली. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांचा आक्रमक पवित्रा पाहता आता या घोटाळ्यातील दोषींवर कारवाई अटळ मानली जात आहे.

---------------------------------------

तपासातून जे दस्तऐवज उपलब्ध झाले ते सर्व आरोपींना देण्यात आल्याचे सरकारी पक्षाने स्पष्ट केले. विष्णू चाटे च्या अर्जासोबतच जयराम चाटेच्या जामीन अर्जावरही 17 जून रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील न्यायालयीन घडामोडींकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे

-----------------------------------

येथून पुढे निर्मळ यांनी बोलताना भान ठेऊन बोलावे अन्यथा जशास तसे उत्तर देऊ असे देखिल पत्रकार परिषदेमध्ये राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी निर्मळ यांना सुनावले आहे पण धारूर शहरामध्ये सर्व शहरवासिय आनंदाने राहात असताना राजकारणाच्या आडून जातिय वादाची झालर कोण पसरवित आहे हा प्रश्न शहरवासियांना पडलेला आहे आमदार सोळंके साहेब यांचा गैरसमज असेल पण आमदार सोळंके साहेब यांना धारूर तालुक्यामध्येच जास्त मतांची लिड मिळुन शेवटच्या टप्प्यात विजयी झालेले आहेत मुंडे - बहिण - भावाने - त्यांचे कामच केलेले आहे राज्याच्या मंत्री ताईसाहेब यांनी या माजलगाव मतदार संघात चाललेल्या राजकिय परिस्थितीवर बोलून या सोळंके आणि निर्मळ यांच्या राजकिय शाब्दिक वादाला पुर्ण विराम देणे गरजेचे आहे अन्यथा ताईसाहेब आपण जर शांत बसुन बघत राहिलात तर श्री माधवजी निर्मळ यांचा राजकिय बळी होऊ शकतो आपली राजकिय ताकत श्री निर्मळ यांच्या पाठीमागे राहाणे गरजेचे आहे असे माजलगाव मतदार संघातील जनता बोलताना दिसत आहे

---------------------------------

पाण्याला प्राधान्य द्यावे आणि पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. शासकीय यंत्रणांकडून विविध जलस्त्रोतांवर लक्ष ठेवण्यात येत असून परिस्थितीचा नियमित आढावा घेतला जात आहे. जूनअखेरपर्यंत समाधानकारक पाऊस झाला नाही तर जिल्ह्यातील जलसाठ्यांवर मोठा ताण येऊ शकतो. आधीच अनेक प्रकल्प मृतसाठ्यावर पोहोचल्याने पिण्याचे पाणी, शेती आणि जनावरांच्या चाऱ्यासाठी आवश्यक पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. पाऊस लांबल्यास जिल्ह्यात पाणीबाणीचे संकट अधिक तीव्र होऊ शकते अशी भीती जलसंपदा विभागाने व्यक्त केली आहे.

----------------------------------

324/2025, कलम 303(2) बीएनएस3. पोलीस ठाणे गंगाखेड, जि. परभणी गु.र.नं. 29/2026, कलम 303(2) बीएनएसउर्वरित तीन दुचाकींबाबत अद्याप अभिलेख उपलब्ध झाले नसून त्याचा पुढील तपास अंबाजोगाई शहर पोलीस करीत आहेत.ही कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस उपअधीक्षक अंबाजोगाई श्री. ऋषिकेश शिंदे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंडेवाद यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णू मानाप, गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, विकी सुरवसे आणि चालक अतुल हराळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

--------------------------------------

ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख वरेकर म्हणाले, घोषणांचा पाऊस पाडून आणि जनतेला गाजर दाखवून सत्तेवर आलेले फडणवीस सरकार फसवे आणि जुमलेबाज आहे. जोपर्यंत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासारखी कर्जमाफी होत नाही तोपर्यंत हे आंदोलन चालूच राहणार. आम्ही कायम शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीर शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी तालुकाप्रमुख गोरख सिंगण, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, जिल्हा संघटक रतन गुजर, सहकार सेना जिल्हाप्रमुख गणेश जाधव, माजी तालुकाप्रमुख मदन परदेशी यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी तालुकाप्रमुख राम नारायण जाधव, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, नंदू येवले, ज्ञानेश्वर काशीद, संदीप भानप, बारीकराव येवले, मुकेश घुमरे आदी उपस्थित होते.

---------------------------

निष्कासित करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पक्षादेशात संघटनेचे ध्येय, धोरण आणि उद्दिष्टांचे पालन करण्यात अपयश आल्याचा तसेच आर्थिक स्वरूपाच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. ही कारवाई प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चूभाऊ कडू यांच्या आदेशानुसार करण्यात आल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. यापुढे गोपाल पैंजणे यांचा संघटनेशी कोणताही संबंध राहणार नसून त्यांनी संघटनेच्या नावाचा किंवा पदाचा वापर करू नये, अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

------------------------------------------

पत्रकार परिषदेच्या प्रारंभी पुणे जिल्हा व सत्र न्यायालयातील अधिवक्ता ॲड. शुभांगी देशमुख यांनी प्रास्ताविक केले. यानंतर ॲड. शंकर चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक मा. सदानंद दाते (IPS) यांना दिनांक 10 जून 2026 रोजी सादर करण्यात आलेल्या निवेदनातील मुद्दे पत्रकारांसमोर मांडले.

यावेळी बोलताना ॲड. चव्हाण म्हणाले की, महाराष्ट्रातील अनेक नागरिकांकडून सातत्याने अशा तक्रारी प्राप्त होत आहेत की, संज्ञेय गुन्ह्यांची माहिती दिल्यानंतरही काही पोलीस ठाण्यांमध्ये FIR तत्काळ नोंदवून घेतली जात नाही. अनेक वेळा तक्रारदारांना वारंवार पोलीस ठाण्याच्या फेऱ्या माराव्या लागतात, अर्ज स्वीकारण्यात विलंब केला जातो किंवा विविध कारणे सांगून प्रक्रिया लांबवली जाते. सर्वोच्च न्यायालयाने Lalita Kumari विरुद्ध उत्तर प्रदेश शासन (2014) या ऐतिहासिक निर्णयात संज्ञेय गुन्ह्याची माहिती मिळाल्यानंतर FIR नोंदविणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले असताना प्रत्यक्षात अनेक नागरिकांना न्याय मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीबाबत बोलताना ॲड. चव्हाण यांनी चिंता व्यक्त केली. पुणे हे शिक्षण, उद्योग, आयटी आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अग्रगण्य शहर म्हणून ओळखले जात असले तरी गेल्या काही वर्षांत खून, महिला अत्याचार, टोळीयुद्ध, ड्रग्ज रॅकेट, आर्थिक गुन्हे आणि संघटित गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे चित्र समोर येत आहे. कायद्याचे राज्य अधिक प्रभावी करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

पत्रकार परिषदेत सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे पोलीस ठाण्यांमधील व्हिडिओ रेकॉर्डिंगचा प्रश्न. ॲड. चव्हाण यांनी सांगितले की, भारतीय राज्यघटनेच्या कलम 19(1)(a) अंतर्गत प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. तसेच कलम 21 नागरिकांना न्याय्य प्रक्रिया आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण प्रदान करते. सर्वोच्च न्यायालयाने Paramvir Singh Saini विरुद्ध Baljit Singh (2020) या प्रकरणात देशातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये CCTV यंत्रणा कार्यरत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. यावरुन पोलीस प्रशासनातील पारदर्शकतेला सर्वोच्च न्यायालयाने दिलेले महत्त्व स्पष्ट होते.

याच पार्श्वभूमीवर त्यांनी महाराष्ट्र शासन आणि पोलीस महासंचालकांकडे अशी मागणी केली की, राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांसाठी व्हिडिओ रेकॉर्डिंगसंदर्भात स्पष्ट Standard Operating Procedure (SOP) जारी करण्यात यावी. नागरिकांनी पोलिसांच्या अधिकृत कामात अडथळा निर्माण न करता, कायद्याच्या चौकटीत राहून केलेल्या रेकॉर्डिंगबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे असावीत. यामुळे नागरिक आणि पोलीस यांच्यातील अनावश्यक वाद टाळले जातील आणि पारदर्शकता वाढण्यास मदत होईल.

ॲड. चव्हाण यांनी सांगितले की, पोलीस हे समाजाचे रक्षणकर्ते आहेत आणि महाराष्ट्र पोलीस दलाविषयी त्यांना पूर्ण आदर आहे. ही पत्रकार परिषद कोणत्याही पोलीस अधिकारी किंवा संस्थेविरोधात नसून नागरिकांचे हक्क, न्यायप्रवेश आणि पोलीस प्रशासनातील उत्तरदायित्व याबाबत सकारात्मक चर्चा घडवून आणण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

यावेळी त्यांनी पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्याशी झालेल्या भेटीचाही उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, नागरिकांच्या विविध समस्या आणि मागण्यांबाबत सादर करण्यात आलेले निवेदन दाते यांनी स्वीकारले असून त्यावर सविस्तर चर्चा झाली. राज्यातील नागरिकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि पोलीस प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यासाठी शासनाने सकारात्मक पावले उचलावीत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

पत्रकार परिषदेत ॲड. चव्हाण यांनी काही महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या. त्यामध्ये संज्ञेय गुन्ह्यांमध्ये FIR नोंदणीची प्रभावी अंमलबजावणी, तक्रारदारांना लेखी पावती देणे बंधनकारक करणे, सर्व पोलीस ठाण्यांमध्ये नागरिकांच्या अधिकारांचे फलक लावणे, CCTV यंत्रणा नियमित कार्यरत ठेवणे, व्हिडिओ रेकॉर्डिंग संदर्भात स्पष्ट SOP जारी करणे, तसेच पुणे आणि महाराष्ट्रातील वाढत्या गुन्हेगारीविरोधात विशेष मोहीम राबविणे यांचा समावेश होता.

"लोकशाही व्यवस्थेत नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास हा सर्वात मोठा आधार असतो. तो विश्वास अधिक मजबूत करण्यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचा सन्मान आवश्यक आहे. शासन, पोलीस प्रशासन आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम केल्यास महाराष्ट्र अधिक सुरक्षित आणि न्यायपूर्ण राज्य बनू शकतो," असे प्रतिपादन ॲड. शंकर चव्हाण यांनी यावेळी केले.

पत्रकार परिषदेस विविध वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, डिजिटल मीडिया प्रतिनिधी, वकील, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच पत्रकार परिषदेत मुक्त पत्रकार अक्षय बनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

-----------------------------------------

कृष्णा सुर्यवंशी, आरोग्य सेवक आनंद घोडके, लॅब टेक्निशियन प्रितम बचुटे, आरोग्य सेविका रंजना दोडतले, आशाताई रोहिणी खरात, वनमाला सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

---------------------------------------

चोरटे स्वतःची मोटरसायकल जागीच सोडून शेतामध्ये पळून गेले होते. घटनेची माहिती मिळताच केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे व त्यांच्या पथकाने तातडीने तपास चक्र फिरवले. सीसीटीव्ही फुटेज आणि मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयित चोरटे केज शहरातून कळंब रोडने जातअसताना पोलिसांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला.मात्र, पोलिसांना पाहून दरोडेखोरांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्परतेने पाठलाग करून हॉटेल संतोष पॅलेस समोर दोन आरोपींना बेड्या ठोकल्या. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे शेषेराव हिम्मत शिंदे आणि भिमा आबा काळे अशी असून ते धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी आहेत. आरोपीं च्या झडतीमध्ये चोरीची रोख रक्कम जप्त करण्यात आली असून, केज पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास केज पोलिस करीत आहेत.

----------------------------------------

चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असताना स्वच्छता व्यवस्थेचे आधुनिकीकरण आणि विकेंद्रीकरण करणे आवश्यक बनले आहे. शहरातील 15 प्रभागात 01 ते 05 असे तीन स्वतंत्र स्वच्छता झोनमध्ये विभागल्यास प्रत्येक झोनसाठी स्वतंत्र पर्यवेक्षक, कर्मचारी, वाहने आणि यंत्रसामग्रीचे नियोजन करता येईल. त्यामुळे रस्ते सफाई, घंटागाडी व्यवस्था, कचरा संकलन, नाले स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणांची देखभाल आणि तक्रार निवारण अधिक वेगाने व प्रभावीपणे करता येईल.नागरिकांचे म्हणणे आहे की, सध्या संपूर्ण शहरातील स्वच्छतेची जबाबदारी एका व्यवस्थेवर असल्याने अनेक भागांकडे अपेक्षित लक्ष दिले जात नाही. काही भागात नियमित सफाई होत असली तरी नव्याने विकसित झालेल्या वस्त्यांमध्ये स्वच्छतेच्या समस्या वारंवार समोर येतात. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून झोननिहाय व्यवस्था उभारणे गरजेचे आहे.विशेष म्हणजे, तीन झोनची व्यवस्था अस्तित्वात आल्यास नगरपरिषदेवरील प्रशासकीय ताणही मोठ्या प्रमाणात कमी होईल. प्रत्येक झोनची स्वतंत्र जबाबदारी निश्चित झाल्यामुळे कामकाजाचे नियोजन अधिक सुलभ होईल. तसेच स्वच्छतेबाबत येणाऱ्या तक्रारींवर तत्काळ कारवाई करणे शक्य होईल. यामुळे नागरिकांनाही अधिक दर्जेदार सेवा मिळू शकेल.याबाबत नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, स्वच्छता सभापती आणि मुख्याधिकारी यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन स्वच्छता व्यवस्थेचा अभ्यास करून तीन झोनची अंमलबजावणी करण्यासाठी ठोस आराखडा तयार करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.तज्ज्ञांच्या मते, स्वच्छतेचे विकेंद्रीकरण केल्यास केवळ स्वच्छता सुधारत नाही तर प्रशासनातील उत्तरदायित्व आणि पारदर्शकताही वाढते. तसेच स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण आणि इतर शासकीय उपक्रमांमध्ये शहराची कामगिरी सुधारण्यास मदत होते.अंबाजोगाई हे शिक्षण, आरोग्य आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर असल्याने शहराची स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम आणि आधुनिक असणे आवश्यक आहे. त्यामुळे नगरपरिषदेने तातडीने या विषयाचा विचार करून तीन झोनच्या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. शहराच्या स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी भविष्यासाठी ही बाब आता केवळ मागणी नसून काळाची गरज बनली आहे.

---------------------------------------------

सर्वोच्च पुरस्कारासाठी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. रणरागिणी प्रतिष्ठान'च्या माध्यमातून शोषितांच्या हक्कासाठी आणि महिलांच्या न्यायासाठी दिलेल्या प्रदीप्त संघर्षाची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे.

-------------------------------

एक शिक्षक सकाळी दहा वाजता तर दुसरे शिक्षक साडेदहा वाजता शाळेत पोहोचल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. शिक्षकांना उशिराबाबत विचारणा केली असता, पाठ्यपुस्तके आणण्यासाठी उशीर झाल्याचे कारण सांगण्यात आले. मात्र पुस्तके अद्याप शाळेत पोहोचली नसल्याची माहितीही देण्यात आल्याचा दावा पालकांनी केला. जिल्हाभरात शाळा प्रवेशोत्सव, नवागतांचे स्वागत, पुस्तक वाटप आणि विविध उपक्रमांमुळे शाळांचा पहिला दिवस उत्साहात पार पडला. मात्र ढगेवाडी येथे विद्यार्थी शाळेसमोर उभे राहून शिक्षकांची वाट पाहत असल्याचे चित्र दिसले. परिणामी अनेक शाळा सुरु होण्यापूर्वीच घरी परतावे लागले. वीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे स्वागत, पालकांशी संवाद, शाळा परिसराची स्वच्छता आणि प्रवेशोत्सवाचे नियोजन अपेक्षित असताना ढगेवाडी शाळेत असे कोणतेही नियोजन दिसून आले नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे. पहिल्या दिवशी शिक्षकांनी शाळा सुरु होण्यापूर्वी उपस्थित राहून पालकांच्या भेटीगाठी घेणे, विद्यार्थी संख्या वाढीसाठी प्रयत्न करणे आणि शाळा स्वच्छ ठेवणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात दहा-साडेदहानंतर शालेय पोषण आहार बनविणाऱ्या महिलांकडून शाळेची स्वच्छता करून घेण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी कोणताही कार्यक्रम आयोजित करण्यात आला नव्हता. त्यामुळे उत्साहाने आलेल्या विद्यार्थ्यांचा पहिला दिवस नियोजनाअभावी वाया गेल्याची खंत पालकांनी व्यक्त केली.

-----------------------------------------

# बीडमध्ये घरकुलाच्या 20 हजार ब्रास वाळूची अधिकाऱ्यांनीच केली चोरी, माफिया बदनाम



बीड : गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन येथील गोदावरी नदीपात्रातून घरकुल लाभार्थ्यांच्या नावाखाली झालेल्या हजारो ब्रासच्या महा-वाळू घोटाळ्याप्रकरणी आता मोठी कारवाई होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतलेल्या सुनावणीनंतर अखेर दोषींवर गुन्हा दाखल करण्याच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत. या प्रकरणात 2 तलाठी, 2 कोतवाल, 1 ऑपरेटर आणि 14 दलाल, अशा एकूण 19 जणांवर चकलांबा पोलिस ठाण्यात फौजदारी (चोरीचा) गुन्हा दाखल होणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. यासाठी गेवराईच्या नायब तहसीलदारांना प्राधिकृत करण्यात आले असून, मंगळवारी (दि. 16 जून) हा गुन्हा दाखल होण्याची दाट शक्यता आहे.सोमवारी दिवसभर पोलिस प्रशासन आणि महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी या कारवाईबाबत एकमेकांच्या संपर्कात होते. महसूलचे एक वरिष्ठ अधिकारी या घोटाळ्याशी संबंधित सर्व महत्त्वाच्या फाइल्स घेऊन पोलिस अधीक्षक कार्यालयात पोहोचले होते. त्यानंतरच पोलिस प्रशासनाने गुन्हा दाखल करण्याच्या दृष्टीने कायदेशीर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राक्षसभुवन येथील गोदावरी पात्रातून दीड हजार घरकुलधारकांना प्रत्येकी 5 ब्रास मोफत वाळू देण्यासाठी प्रशासनाने हा वाळू घाट मंजूर केला होता. मात्र, वाळूमाफियांनी काही शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून गरिबांच्या घरकुलाचे 'ओटीपी' मिळवले. लाभार्थ्यांना वाळूचा एक कणही न देता, त्यांच्या नावावर हजारो ब्रास वाळूचा अवैध उपसा करून ती चढ्या दराने बाजारात विकली. या गंभीर प्रकाराबाबत आमदार विजयसिंह पंडित यांनी तक्रार केली होती. त्यानंतर तातडीने 40 पान 3 वर

# संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा खटला वेगाने चालविण्याचे संकेत !



बीड, : राज्यभर चर्चेत असलेल्या सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या सुनावणीला सोमवारी नवे वळण मिळाले. नवनियुक्त न्यायाधीश जयश्री पुलाटे यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत आरोपी विष्णू चाटेच्या जामीन अर्जावर दोन्ही बाजूंकडून सविस्तर युक्तिवाद करण्यात आला. या प्रकरणाची पुढील सुनावणी 17 जून रोजी होणार असून त्यादिवशी विष्णू चाटेच्या अर्जावर निर्णय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सुनावणीच्यावेळी विशेष सरकारी पक्षाने खटल्याच्या गतीबाबत व्यक्त केलेली चिंता न्यायालयाने गांभीर्याने घेतल्याचे दिसून आले. येत्या सुनावणीत कोणत्या साक्षीदारांची साक्ष कधी नोंदविण्यात येणार याबाबतचा अहवाल न्यायालयात सादर करण्यात येणार असून त्यानंतर खटल्याच्या नियमित सुनावणीला वेग मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, आरोपी विष्णू चाटे याने तपासातील लॅपटॉपची क्लोन कॉपी देण्याची मागणीही केली होती. याबाबत फॉरेन्सिक पान 3 वर

# सोळंके - मुंडे राजकिय वादाला किल्ले धारूर शहरामध्ये लागले वेगळेच वळण ॥

## जातीय वादाची झालर पसरविण्याचा डाव कोणाचा



धारुर ( बाबुराव तिडके ) माजलगाव मतदार संघामधील राजकिय वातावरण आता वयक्तिक वळणावर जाताना दिसत आहे आमदार सोळंके साहेब यांनी मुंडे - बहीण - भावावर राजकिय टीका केली याला उत्तर म्हणून श्री माधव निर्मळ यांनी आमदार सोळंके साहेब यांच्यावर देखिल सडकुन टीका केली राजकिय प्रवाहामध्ये भिकारचोट नितिमत्ता संधीसाधु डोक्यावर पडलेले गाढवाच्या पुढे वाचली गिता असे अनेक राजकिय शब्दाचे प्रहार धारूर शहरातील नेत्यांनी एकमेकांना संबोधित केले श्री माधव निर्मळ यांनी आमदार साहेबांवर टीका केल्यानंतर धारूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष श्री बालाजी जाधव राष्ट्रवादीचे धारूर तालुका अध्यक्ष श्री अमोल जगताप यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन श्री माधव निर्मळ यांचे नाव घेऊन डोक्यावर पडलेले तात्या गाढवाच्या पुढे वाचली गिता असे अनेक शाब्दिक प्रहार निर्मळ यांच्यावर करण्यात आले परंतु या राजकिय भांडणावर मुंडे बहिण - भाऊ बोलायला अजिबात तयार नाहीत हे मतदार संघाचे भांडण आता किल्ले धारूर शहरामध्ये येऊन ठेपलेले असून धारूर शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आता श्री माधव निर्मळ यांना टारगेट करू पाहात आहे पान 3 वर

# बीड जिल्ह्यावर पाणीबाणीचे सावट; जलसाठ्यात घट

## ➔ 14 लघु प्रकल्प कोरडे, 71 प्रकल्प मृतसाठ्यात; पाणी जपून वापरण्याचे आवाहन



बीड, : बीड जिल्ह्यात मान्सूनच्या आगमनाला विलंब होत असून जून महिन्याचा अर्धा कालावधी उलटूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने जिल्ह्यावर संभाव्य पाणीटंचाईचे संकट गडद होऊ लागले आहे. धरणे, लघु प्रकल्प आणि जलसाठ्यांमधील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावत असल्याने प्रशासनासह शेतकरी वर्गाची चिंता वाढली आहे जलसंपदा विभागाच्या ताज्या अहवालानुसार जिल्ह्यातील अनेक प्रकल्पांमधील पाणीसाठा धोक्याच्या पातळीपर्यंत घसरला आहे. जिल्ह्यातील 14 लघु प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले असून तब्बल 71 प्रकल्प मृतसाठ्यावर पोहोचले आहेत. अनेक ठिकाणी उपयुक्त पाणीसाठा अत्यल्प शिल्लक राहिल्याने आगामी काही आठवडे यंदा मान्सूनच्या प्रारंभी अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप हंगामाच्या तयारीवरही परिणाम होऊ लागला आहे. अनेक भागांतील शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण केली असली तरी पावसाअभावी पेरण्या खोळंबल्या प्रश्नही गंभीर बनण्याची चिन्हे दिसत आहेत. धरणे आणि लघु प्रकल्पांतील पाणीसाठ्यात सातत्याने घट होत असल्याने ग्रामीण भागातील विहिरी, बोअरवेल आणि पावसाची आणखी दिरंगाई झाल्यास अनेक गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची वेळ येण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील उपलब्ध पाणीसाठा पाहता नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरावे, पिण्याच्या पान 3 वर

# मोटारसायकल चोरी करणारा आरोपी जेरबंद; सहा दुचाकी जप्त, तीन गुन्हे उघड



बीड | प्रतिनिधी : बीड जिल्ह्यात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत मोटारसायकल चोरी करणाऱ्या एका आरोपीस अटक केली असून त्याच्याकडून सुमारे 2 लाख 20 हजार रुपये किमतीच्या सहा दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे तीन गुन्ह्यांची उकल झाली आहे.

पोलीस अधीक्षक बीड यांच्या आदेशानुसार दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरु असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे संतोष बाबासाहेब मुंडे (रा. वरवटी, ता. अंबाजोगाई) याच्यावर संशय घेतला. 15 जून 2026 रोजी मिळालेल्या माहितीनुसार आरोपीने चोरलेल्या दुचाकी आपल्या घराच्या मागे लपवून ठेवल्या असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.चौकशीत आरोपीने अंबाजोगाई येथून दोन, पुणे येथून एक, लातूर येथून एक आणि परभणी येथून एक अशा एकूण सहा दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी घटनास्थळावरून सहा दुचाकी जप्त केल्या.या प्रकरणात खालील गुन्ह्यांची उकल झाली आहे :1. पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं. 132/2026, कलम 303(2) बीएनएस2. पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं. पान 3 वर

# शिवसेनेच्या ट्रॅक्टर मोर्चाने बीड दणाणले; फडणवीस सरकार फसवे आणि जुमलेबाज- जिल्हाप्रमुख वरेकर



भाजपा प्रणित सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीतील विचित्र अटी आणि शर्तींच्या विरोधात बीडमध्ये आज मंगळवारी शिवसेना रस्त्यावर उतरली. संतप्त शिवसैनिक आणि शेतकऱ्यांचा ट्रॅक्टर मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला.भाजपाचे सरकार फसवे आणि जुमलेबाज असल्याचा आरोप जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी केला. यावेळी शेतकऱ्यांच्या हातामध्ये सरकारच्या विरोधातील झळकणारे बॅनर शेतकऱ्यांचा संताप दर्शवत होते.

सरकारने कर्जमाफी जाहीर केली मात्र कर्जमाफी देताना त्याचा शेतकऱ्यांना फायदा होवू नये हाच दृष्टीकोण समोर आला. जाचक आणि शर्ती लादल्यामुळे या कर्जमाफीचा शेतकऱ्यांना फायदा होत नसल्याचे समोर आल्यानंतर शिवसेना नेते अंबादास दानवे यांच्या आदेशावरून संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वात आज जिल्हाधिकारी कार्यालयावर पान 3 वर

# गोपाल पैंजणेची पक्षातून हकालपट्टी

## कार्याध्यक्षांची कारवाई; तालुकाध्यक्ष पदासह सदस्यत्वही गेले

बीड : प्रहार संघटनेचे माजलगाव तालुकाध्यक्ष गोपाल पैंजणे यांच्याविरोधातील कथित व्हायरल ऑडिओ प्रकरण आणि त्यानंतर समोर आलेल्या विविध तक्रारींची दखल घेत अखेर संघटनेच्या वरिष्ठांनी मोठी कारवाई केली आहे. गोपाल पैंजणे यांना तालुकाध्यक्ष पदावरून हटविण्यात आले असून संघटनेच्या प्राथमिक सदस्यत्वातूनही निष्कासित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे प्रहार संघटनेत मोठी खळबळ उडाली आहे.

काही दिवसांपूर्वी बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटपासाठी निधी मागणी केल्याचा कथित ऑडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या प्रकरणाची वृत्तपत्रांनी दखल घेत वृत्त प्रसिद्ध केले होते. त्यानंतर संघटनेच्या वरिष्ठांकडे तक्रारींचा ओघ वाढला होता. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन वरिष्ठ पातळीवरून माहिती मागविण्यात आली होती. दरम्यान, प्रहार संघटनेचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष महेंद्र ऊर्फ बल्लू जवंजाळ यांनी जारी केलेल्या पक्षादेशानुसार गोपाल पैंजणे यांना माजलगाव तालुकाध्यक्ष पदावरून कमी करण्यात आले आहे. तसेच त्यांना संघटनेतून पान 3 वर

# पुण्याची वाढती गुन्हेगारी, FIR नोंदणीतील अडचणी आणि पोलीस ठाण्यांतील व्हिडिओ रेकॉर्डिंगबाबत स्पष्ट धोरणाची मागणी

## ; ॲड. शंकर चव्हाण यांची पुण्यात पत्रकार परिषद संपन्न



पुणे | प्रतिनिधी

महाराष्ट्रातील पोलीस ठाण्यांमध्ये FIR नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, नागरिकांचे घटनात्मक अधिकार, पोलीस ठाण्यांतील पारदर्शकता, व्हिडिओ रेकॉर्डिंगसंदर्भातील कायदेशीर स्थिती तसेच पुण्यातील वाढती गुन्हेगारी या महत्त्वाच्या विषयांवर मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता ॲड. शंकर चव्हाण यांनी आज पुणे श्रमिक पत्रकार संघ (प्रेस क्लब) येथे पत्रकार परिषद घेतली. पान 3 वर

# आयुष्यमान आरोग्य मंदिर सारणी (आ) येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न !



केज प्रतिनिधी/रोहन गलांडे प्राथमिक आरोग्य केंद्र, युसूफवडगाव अंतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदिर, सारणी (आ) व ग्रामपंचायत सारणी (आ) यांच्या संयुक्त विद्यमानाने (असंसर्गजन्य रोग) कॅम्प आयोजित करण्यात आला होता.या शिबिरा मध्ये करण्यात आलेल्या तपासण्यमध्ये रक्तदाब, मधुमेह/ रक्तातील साखर तपासणी, कर्करोग तपासणी, ईसीजी तपासणी, हिमोग्लोबीन सह सर्व आजारांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. हे शिबीर आयोजित करण्यासाठी केज तालुका आरोग्य अधिकारी डॉ. लोमटे सर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सारूक सर, डॉ. नागरे मॅडम यांच्या मार्गदर्शना खाली हे शिबीर सारणी (आ) येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. पान 3 वर

# केज-अंबाजोगाई रोडवर दरोडा टाकणारे 2 अट्टल गुन्हेगार जेरबंद,केज पोलिसांची धडाकेबाज कारवाई !




केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे

केज-अंबाजोगाई रस्त्यावर रात्रीच्या वेळी चाकूचा धाक दाखवून पती-पत्नीला लुटणाऱ्या चार दरोडेखोरांपैकी दोघांना केज पोलिसांनी सिनेस्टाईलने पाठलाग करून अटक केली आहे. ही धडक कारवाई दि.14 जून 2026 रविवार रोजी करण्यात आली. दि.13 जून रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास धनराज सूर्यवंशी व त्यांची पत्नी आपल्या मोटरसायकलवरून पिसेगाव फाट्यावरून गावाकडे जात असताना, चार अज्ञात दरोडेखोरांनी त्यांची गाडी अडवली.आरोपींनी चाकूचा धाक दाखवून जोडप्याकडून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून घेतले. यावेळी पीडित दांपत्याने आरडाओरडा केल्याने घाबरलेले पान 3 वर

# अंबाजोगाई शहराच्या वाढत्या विस्तारामुळे स्वच्छता विभागाची तीन झोनमध्ये विभागणी करण्याची गरज !

## लोकप्रतिनिधी व प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी




अंबाजोगाई प्रतिनिधी /रोहन गलांडे अंबाजोगाई शहराची वाढती लोकसंख्या, नव्याने विकसित होणारे भाग आणि स्वच्छतेबाबत नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेता नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाची तीन झोनमध्ये विभागणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. सध्या संपूर्ण शहराची स्वच्छता व्यवस्था एकाच प्रशासकीय नियंत्रणाखाली चालविली जात असल्याने अनेक ठिकाणी मनुष्यबळाची कमतरता, कामांचे नियोजन, कचरा संकलनातील विलंब आणि तक्रार निवारणामध्ये अडचणी निर्माण होत असल्याची पान 3 वर

# आम्रपाली साबळे यांना प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय युवा लोकमित्र रणरागिणी सामाजिक गौरव पुरस्कार' जाहीर !



केज प्रतिनिधी/रोहन गलांडे

महामानवांच्या प्रोगामी विचारसरणीचा वारसा उराशी बाळगून अन्याय आणि शोषणाविरुद्ध अखंड संघर्ष करणाऱ्या बीड येथील अग्रगण्य सामाजिक कार्यकर्त्या, 'रणरागिणी प्रतिष्ठान'च्या अध्यक्षा तथा 'अन्याय, अत्याचार व भ्रष्टाचार निर्मूलन समिती'च्या मराठवाडा उपाध्यक्ष आम्रपाली साबळे यांना यंदाचा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठित राज्यस्तरीय युवा लोकमित्र रणरागिणी सामाजिक गौरव पुरस्कार 2026 जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या 5 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या वादळी, निर्भय आणि धडाकेबाज कामगिरीबद्दल त्यांची या पान 3 वर

# ढगेवाडीत पहिल्याच दिवशी शाळेला कुलूप

## • पालकांचा संताप; शिक्षक उशिरा पोहोचल्याने विद्यार्थ्यांचा हिरमोड; संबंधितांवर कारवाईची मागणी




धारूर : एकीकडे जिल्हाभरात शाळा प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत होत असताना धारूर तालुक्यातील ढगेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मात्र नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी धक्कादायक प्रकार समोर आला. शिक्षक वेळेत शाळेत न पोहोचल्याने शाळेला कुलूप असल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे उत्साहाने शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांचा हिरमोड झाला असून पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. पालकांच्या म्हणण्यानुसार, विद्यार्थी सकाळी साडेनऊ ते दहा वाजेपर्यंत शाळेसमोर थांबून होते. मात्र शाळा बंदच असल्याने अनेक विद्यार्थी पालकांसह घरी परतले. त्यानंतर पान 3 वर